● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ४१ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४




yuva.aadarsh@gmail.com

RNI: MAHMAR/2019/78282

# युवा आदर्श

https://www.facebook.com/yuvaaadarshnews/

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो. ८३९००९८८८६ शनिवार, दि ३१ ऑगस्ट २०२४ https://yuvaadarsh.com

### विद्यार्थी-विद्यार्थीनीच्या सुरक्षा विषयक उपाययोजनांची कार्यशाळा संपन्न

## ... तर संबंधित मुख्याध्यापकावर कारवाई - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** शालेय विद्यार्थ्यांचा शिक्षणासोबतच त्यांच्या सुरक्षेचा मुद्दा अत्यंत महत्वपूर्ण आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व शाळेच्या परिसरात तातडीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच शाळेत स्वसंरक्षणासह गुड टच, बॅड टच याबाबत धडे देण्यात यावेत. शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळेत अनुचित प्रकार घडला असल्याचे लक्षात येताच संबंधितांवर तात्काळ गुन्हा नोंद करावा. शाळेत एखादी अनुचित घटना घडूनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यास संबंधित मुख्याध्यापकावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात विद्यार्थी-विद्यार्थीनीच्या सुरक्षा विषयक उपाययोजना कार्यशाळा पार पडली, याप्रसंगी ते बोलत होते. कार्यशाळेत जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मिना, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, जि.प. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, अतिरिक्त पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ, मंगला धुपे यांची प्रमुख उपस्थिती होती.



जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले की, विद्यार्थ्यांची सुरक्षा सर्वतोपरी असल्याने यात तडजोड करण्यात येवू नये. मुख्याध्यापकासह शिक्षकांनी विद्यार्थी-विद्यार्थीनीच्या सतत संपर्कात रहावे तसेच दोघांच्याही सुरक्षितेवर लक्ष द्यावे. शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेबाबाबत करावयाच्या ठोस उपाययोजनांचा भाग म्हणून मुख्याध्यापकांच्या कक्षाजवळ तक्रार पेटी बसवावी तसेच त्यामधील नियमित तक्रार पाहण्यापासून ते तक्रारींचे निराकरण करण्याचे काम स्वत: मुख्याध्यापकांनी करावे. शाळांनी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याच्या नेमणुकीपुर्वी स्थानिक पोलिस विभागाकडून चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक राहील. खाजगी शाळेच्या बसवर संबंधित **पान २ वर**

## यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा, पावसाची शक्यता

### दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. ३० ऑगस्ट ते ३ सप्टेंबर २०२४ या कालावधीत रोजी यलो अलर्ट जारी केला असुन ३० ऑगस्ट ते १ सप्टेंबर कालावधीत तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. दि.२ व ३ सप्टेंबर रोजी यलो अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ५०-६० कि.मी.प्र.ता. वेगाने) मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे, तरी जिल्ह्यातील नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, विजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किवा झाडांजवळ उभे राहु नये. बीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. विजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर **पान २ वर**

### शिवचैतन्य प्रतिष्ठान; दहीहंडी महोत्सव - २०२४

## महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित रहा - प्रतिक दानवे

**जालना । प्रतिनिधी -** श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त शिवचैतन्य प्रतिष्ठान, जालना च्या वतीने शिवचैतन्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन चंद्रशेखर आझाद मैदान, जालना येथे करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उदघाटन माजी केंद्रीय राज्यमंत्री मा.ना.श्री. रावसाहेब पाटील दानवे यांच्या शुभहस्ते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष पालकमंत्री मा.ना.श्री. अतुलजी सावे व भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर दानवे यांचे मार्गदर्शन राहणार आहे.

जालना शहरातील मानाच्या समजणाऱ्या या दहीहंडी चे यंदाचे तिसरे वर्ष आहे. या वर्षी प्रसिद्ध सिने अभिनेत्री सई मांजरेकर या दहीहंडीचे विशेष आकर्षण असणार आहे.

तसेच प्रमुख पाहुणे म्हणून आ.राजेश टोपे, आ.कैलास गोरंटयाल, मा.अर्जुनभाऊ खोतकर, आ.संतोष पाटील दानवे, आ.नारायण कुचे, मा.भास्कर आंबेकर, भाजपा जिल्हाध्यक्ष (ग्रा.) बद्रीनाथ पठाडे, भाजपा महानगराध्यक्ष अशोक (आण्णा) पांगारकर, उद्योजक घनश्याम गोयल, भाजपा प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, जिल्हाधिकारी जालना मा.श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस अधिक्षक अजयकुमार बंसल, मनपा आयुक्त संतोष खांडेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना, अति.पोलीस अधिक्षक आयुष नेपानी, पोलीस निरीक्षक संदीप भारती, उपविभागीय पोलीस अधिकारी आनंत कुलकर्णी, स्थानिक गुन्हे **पान २ वर**

### मोदींच्या माफीनामा; मुख्यमंत्री यांच्या राजीनाम्याची मागणी

**मुंबई -** नरेंद्र मोदी शुक्रवार (दि ३० ऑगस्ट) महाराष्ट्र दौऱ्यावर आले होते. दुपारी त्यांनी पालघर येथील वाढवण बंदराचे भूमिपूजन केले. यावेळी उपस्थितांना संबोधित करताना त्यांनी सिंधुदुर्ग येथील घटनेवर प्रतिक्रिया दिली. तसेच घडलेल्या दुर्घटनेबद्दल सर्व शिवभक्तांची जाहीर माफी देखील मागितली. मोदींच्या माफीनंतर विरोधक राज्य सरकारच्या माफीची व मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची **पान २ वर**

## ए.जे. बोराडे यांच्या परतुरात गावनिहाय भेटीगाठी

**परतुर । प्रतिनिधी -** ठाकरे गटाचे शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांनी शुक्रवार दि.३०, रोजी परतुर तालुक्यातील रायपूर, खांडवी, ठोंबरे टाकळी, शेलगाव, अंगलगाव, कुंभारी सातोना, बिडवे सातोना, वरफळ या गावातील ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी गावपातळीवरील विविध प्रश्नांविषयी जिल्हाप्रमुख श्री बोराडे यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली. यावेळी त्यांच्यासोबत उपजिल्हाप्रमुख माधवमामा कदम, परतुर तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके, मंठा पंचायत समितीचे माजी सभापती संतोष वरकड, मंठा बाजार समितीचे संचालक बाबाराव राठोड, उप तालुकाप्रमुख डॉ.संतोष पवार, परतुर शहरप्रमुख दत्ता पाटील सुरुंग, विभाग प्रमुख रामेश्वर शिंदे, उस्मान शेख, किरण कातारे यांच्यासह विविध गावचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांनी ग्रामस्थांच्या भेटीगाठी घेतल्या. यावेळी रायपूर येथील संजय कुकडे सचिन कुकडे गजानन कुकडे शिवानंद कुकडे, खांडवी येथील चेअरमन अंकुशराव बरकुले, विकास मुरकुटे, वसंत बरकुले, दादाराव बरकुले, बालाजी बरकुले, विष्णू बरकुले, ठोंबरे टाकळी येथील अमृत ठोंबरे, वसंत ठोंबरे, विठ्ठलराव ठोंबरे, गोरक्षनाथ वटाणे, विजय ठोंबरे, दुष्यंत ठोंबरे, ज्ञानेश्वर भले, कृष्णा भले, शेलगाव येथील दिनकर लिपणे, विठ्ठल लिपणे, विलास लिपणे, दत्ता लिपणे, रंगनाथ तारे, राजू लिपणे, अंगलगाव **पान २ वर**



युवा आदर्श

### अत्यवस्थ ...

रोगी होई अत्यवस्थ
वातावरण भितीमय
इलाज हो उच्चतम
नको कसली हयगय
काही वेळा कठीण
कोणता घेऊ निर्णय
भावनिक कोमलता
मनास वेगळी सवय
यक्षप्रश्न पडे पहिला
बरे का हे रुग्णालय
वैद्यकीय सेवा कशी
सारखे सतावते भय
प्रकृति सुधारे बिघडे
झपझप चाले समय
डॉक्टर सिस्टर असून
भोवती विचीत्र वलय
रिपोर्ट कुठलेही येता
धड धड धडके हृदय
पॉझिटीव्ह निगेटिव्ह
असे रोग मात्र निर्दय
पदरात कधी अपयश
आशा होती हस्तमय
अपेक्षा एकचं मनात
पुनश्च सुधरे अनामय
व्याधीमुक्ती अचानक
कधीकधी हो विस्मय
फलश्रुती प्राप्ती मिळे
भक्ती करता निरामय

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## सोयाबीन पीकाला सहा हजार रुपये भाव द्या; उदयसिंह बोराडे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**मंठा । प्रतिनिधी -** सोयाबीन पिकाची आधारभूत किंमत ६०००रुपये सोयाबीन पिक हे राज्यातील मुख्य पीक असून महाराष्ट्र राज्यात सोयाबीन हे पीक शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा आणि उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे. दिवसेंनदिवस वाढत्या महागाईमुळे सोयाबीन पिकाचा उत्पादन खर्च सातत्याने वाढत आहे व त्या तुलनेने कमी दराने सोयाबीन पिकाची खरेदी होत असल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न घटत आहे. सन २०१३-१४ मध्ये सोयाबीनची आधारभुत किंमत ४६०० / रुपये प्रति क्विंटल होती आणि दहा वर्षानंतर २०२३-२०२४ मध्ये सोयाबीनची आधारभुत किंमत ४१००/ रु. प्रति क्विंटल झाली. तर डिझेल, खते, किटक नाशके आणि तृननाशकांच्या किंमतीत २५० % ने वाढ झाली असून औषधी, खते बियाने हे अनेक पटीने वाढली आहे परंतू सोयाबीन या पिकाचा भाव मात्र तोच राहीला आहे. सन २०२४-२५ या आर्थीक वर्षात राज्य सरकाराने सोयाबीन पिकाची आधारभुत किंमत ४८९५ प्रति क्विंटल निश्चीत केली आहे जी शेतकऱ्यांच्या खर्चानुसार खुपच कमी आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांची किंमतीही न मिळाल्यास आणि सरकार त्यांच्या पिकांची हमी भावापेक्षा कमी भावाने खरेदी करणार असेल तर राज्यातील शेतकऱ्यांचे कंबरडे मोडेल. तेंव्हा राज्यातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेवून सोयाबीन पिकाची हमीभाव ६०००/ रुपये प्रति क्विंटल पर्यत वाढवून सोयाबीन पिकाची खरेदी सर्वेच्च प्राधान्याने करण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमीत करावेत.



## ठाकरे किड्स शाळेत जुन्या नाण्यांचे प्रदर्शन

### पालक व विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील रामनगर परिसरात असलेल्या ठाकरे किड्स शाळेत शुक्रवार (दि ३०) रोजी जुन्या नाण्यांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उदघाटन शरद वडगावकर यांच्या हस्ते करण्यात आले.

शाळेतील विद्यार्थी व पालक यांनी या जुन्या नाण्यांच्या प्रदर्शनास भरभरून प्रतिसाद दिला. प्रदर्शनासाठीची नाणी हि शरद वडगावकर व त्यांचे चिरंजिव राहुल वडगावकर व सौ. दिपाली खरात यांनी अनेक वर्षांपासून जपून ठेवली होती. त्या जपून ठेवलेल्या नाणी या प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या. प्रदर्शनामध्ये पुरातन राजे महाराजांच्या कालीन, निजाम कालीन, ब्रिटिश कालीन नाणी तसेच जुन्या भारतीय नाणे हि ठेवण्यात आले होते. पालक आपल्या काळात वापरलेल्या नाण्यांचा उल्लेख करताना आढळली. प्रदर्शनाच्या तयारी साठी शाळेतील शिक्षिका राजश्री माचेवार, प्रतीक्षा कनकुटे, रसिका दिक्षित, आदिती लोळगे, वैष्णवी पोटाबत्तीनं यांनी परिश्रम घेतले. तर शाळेच्या संचालिका सौ. रंजना ठाकरे यांनी विद्यार्थ्यांनीही हा नाणी जमा करण्याचा छंद जोपासावा असे आवाहन केले. सुत्रसंचालन रसिका यांनी केले तर आभार आदिती लोळगे यांनी मानले.






# आज धर्मवीर आनंद दिघे असते तर ?



शिवरायांच्या पुतळ्याचे राजकारण का, कशासाठी, कोणासाठी केले हे आता लपून राहिले नाही.छत्रपती शिवाजी महाराजांचे शिल्प कोसळले हे दुःख अवघ्या विश्वाला झाले.शिवरायांचे नाव घेऊन राजकारण करणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे बालिशपणे ताशी पंचेचाळीस वेगाने वारे वाहतात त्यामुळे पुतळा पडला असे मुर्खासारखे विधान करून अकलेचे तारे तोडले.वातावरण तप्त झाले,म्हणून शिंदे अजित पवार यांनी अनिच्छेने महाराजांची माफी मागून.महाराजांवर फार मोठे उपकार केले. काही जण जाहीरपणे म्हणतात आज महाराज असते तर शिंदे सकट सर्व दोषींचा कडेलोट केला असता. चुकीला माफी नाही म्हणत धर्मवीर आनंद दिघे साहेब आज हयात असते तर त्यांनी शिंदे सहित सर्व दोषींना कडेलोट नाही तर चौरंगाची शिक्षा नक्कीच दिली असती.शिंदे यांचा दोष नाही कारण ते सतत खोटे बोल पण रेटून बोल अशी ज्यांची जगभर ख्याती असलेले देशावर हट्टाने पंतप्रधानपदी विराजमान झालेले नरेंद्र मोदी यांच्या संगतीचा प्रभाव आहे.त्यांच्या सतत संपर्कात राहून त्यांचे विचार अमलात आणून महाराष्ट्राची सर्वतोपरी खच्चीकरण करत आहेत.देशावर कर्ज वाढत आहे तसे आपणही मागे नाही हे दाखवण्यासाठी मतांची तजवीज करत,जनतेला लाचार करून विविध योजना आणून राज्यावर कर्जाचा बोजा वाढवत सुटले आहेत.

पुतळा कोसळला त्या संबंधित असलेल्या सर्वाना कडक शासन झाले पाहिजे. महाराजांच्या पुतळ्यावर सुद्धा स्वतःची आर्थिक तुंबडी भरून घेण्यासाठी भ्रष्टाचार करतात इतका नीचपणा अंगी आला कुठून.पुतळ्यावर झालेला खर्च भरून काढण्यासाठी संपूर्ण मंत्रिमंडळाचा एक वर्षाचा पगार,भत्ते,सोयी सवलती बंद करून वसूल करावा,व संबंधित सर्व हरामखोर व्यक्तींच्या मालमत्तेवर टाच आणून सश्रम कारावासाची शिक्षा द्यावी.पुन्हा समिती नेमून अधिक उंच पुतळा उभारू अशी बतावणी करून आपण फार मोठे कार्य करीत असल्याचा शिंदे देखावा करतात हे अतिशय लांच्छनास्पद आहे.तूर्त गडावर शिवरायांचा पुतळा उभारू नये. तेव्हडी वैचारिक पात्रता महाराष्ट्राच्या नेत्याकडे नाही.

**यशवंत चव्हाण सीबीडी,**
**बेलापूर (नवी मुंबई ) मो.नं.९९२०७७६२७७**

# महिला विश्वविद्यालयात आरोग्यशास्त्राच्या प्राध्यापिका!

० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचे मन संवेदनशील असते. त्यांच्या बुद्धीला याच काळात जास्त आकार मिळत असतो. ही बालके अजाणता, उत्स्फूर्तपणे बाहेरील प्रत्येक गोष्ट, घटना आपल्या मनात साठवून ठेवत असतात आणि त्याबाबत विचारपूर्क अर्थ लावत असतात. कळत नकळत जग समजावून घेण्याचा हा कालावधी असतो. त्यामुळे बालकांना कोणतीही कौशल्ये आणि ज्ञान नकळत आत्मसात होईल, अशी व्यवस्था करणे गरजेचे असते. हीच मॉंटेसरी शिक्षण पद्धतीमागील मुख्य भूमिका आहे. असा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा ज्ञानवर्धक संकलित लेख वाचक सेवेत समर्पित...

मारिया मॉंटेसरी या प्रसिद्ध इटालियन शिक्षणतज्ज्ञ, शारीरविज्ञ व मॉंटेसरी शिक्षणपद्धतीची जनक होती. त्यांचा जन्म दि.३१ ऑगस्ट १८७० रोजी इटलीतील क्याराव्हाले या गावी मध्यमवर्गीय सुशिक्षित कुटुंबात झाला. त्यांचे वडील राज्यसंचालित उद्योगांचे संचालक होते. मॉंटेसरी यांची वाढ होत असताना इटलीमध्ये स्त्रीयांच्या सामाजिक भूमिकेबद्दल रूढीवादी मूल्ये बजावली गेली. त्यामुळे त्यांचे कुटुंब गाव सोडून रोमला गेले. स्त्री शिक्षणाला बंदी असताना त्यांनी वयाच्या चौदाव्या वर्षी तेथील मुलांच्या तांत्रिक शिक्षण संस्थेत प्रवेश घेतला. त्या ठिकाणी त्यांनी गणित विषयातील योग्यता आणि विज्ञानात विशेषत: जीवशास्त्रातील हितसंबंध विकसित केले. इटली देशात सार्वजनिक शाळेत जाणारी पहिलीच मुलगी असा त्यांचा नावलौकिक आहे. त्यामुळे घरातील व बाहेरील लोकांच्या टीकेला लहानपणापासूनच त्यांना तोंड द्यावे लागले. सन १८९६मध्ये त्यांनी रोम विद्यापीठाची वैद्यकाची पदवी मिळविली; मात्र त्यांना अभियंता होण्याची इच्छा होती. वैद्यकाची पदवी मिळविणाऱ्या इटलीतील त्या पहिल्याच महिला होत. वैद्यकीय पदवी मिळविल्यानंतर रोममधील सार्वजनिक रुग्णालयातील वैद्यक-डॉक्टर या जागेसाठी झालेल्या स्पर्धेत त्यांनी भाग घेतला आणि त्यात त्यांना यश मिळाले. त्या इटलीमधील पहिल्याच महिला वैद्यक होत. सन १८९७मध्ये यूरोप खंडात अशा मानाच्या जागी निवडलेली मॉंटेसरी या पहिल्याच महिला होत. वृत्तपत्रांनी त्यांना सूर्यकिरण- सन रे म्हणून गौरविले होते.

डॉ.मॉंटेसरी या सन १८९८मध्ये रोममधील मंदबुद्धी मुलांच्या शाळेच्या प्रमुख झाल्या आणि त्यांच्या मनात शिक्षणकार्याविषयी कुतूहल जागृत झाले. सन १८९८मध्ये तूरीन येथे भरलेल्या वैद्यकीय परिषदेत भाषण करताना त्यांनी मतिमंद मुलांकडे समाज व वैद्यक यांचे होणारे दुर्लक्ष हे गुन्हेगारीचे खरे कारण होय, असा विचार मांडला. त्यांच्या या स्पष्ट सडेतोड विधानाचा यूरोपभर परिणाम झाला. खुद्द इटलीत मंदबुद्धीच्या मुलांसाठी संस्था स्थापन झाल्या. मानसिक वैफल्य ही वैद्यकशास्त्रातील समस्या नसून ती प्रामुख्याने शैक्षणिक समस्या आहे, असे त्यांना वाटत असे. या दृष्टीने त्यांनी मनोविकलांच्या शिक्षणपद्धतीचा अभ्यास केला. सन १८९९मध्ये रोममधील महिला विश्वविद्यालयात आरोग्यशास्त्राची प्राध्यापिका म्हणून त्यांची नेमणूक झाली. १९०० मध्ये लंडनमधील महिला परिषदेस इटालियन महिलांची प्रतिनिधी म्हणून त्या हजर होत्या. त्या ठिकाणी नॅशनल लीगने सुरू केलेल्या ऑर्थोफर्निक स्कूलमध्ये सह समन्वयक म्हणून त्यांनी काम केले. त्यामध्ये त्यांनी ३ ते ६ वर्षे वयांच्या बालकांच्या शिक्षणसाठी अनेक शैक्षणिक साधने निर्माण केली. नवीन पद्धती तयार करताना त्यांनी जीन इटार्ड आणि एडवर्ड सेग्विन या त्यांच्यापूर्वीच्या दोन मानसशास्त्रज्ञांच्या विचारांचा आधार घेतला. सन १९०४मध्ये निष्णात वैद्यक म्हणून संपूर्ण रोममध्ये त्यांची प्रसिद्धी झाली. तसेच रोम विद्यापीठात मानवशास्त्राची प्राध्यापिका म्हणून त्यांची नेमणूक झाली. वृत्तपत्रांनी त्यांना सूर्यकिरण- सन रे म्हणून गौरविले होते.

डॉ.मॉंटेसरी यांनी रोममध्ये त्या काळी गृहनिर्माण समितीने बांधलेल्या प्रत्येक घरात शिशुगृहे उघडण्याची कल्पना शोधून काढली. घरात राहणाऱ्या भाडेकरूंच्या २ ते ७ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना एकत्र करून त्यांची देखरेख शिक्षिकेवर सोपवायची व तिलाही त्याच घरात राहावयास जागा द्यावयाची, अशी ही योजना होती. या समितीने बांधलेल्या घरांचे तेथे राहणाऱ्या मुलांकडून नुकसान होऊ नये, हा या योजनेचा उद्देश होता. त्यातूनच ६ जानेवारी १९०७ रोजी मॉंटेसरी यांनी वरील वयोगटातील बालकांसाठी रोमच्या गलिच्छ वस्तीत बालघर ही पहिली शाळा सुरू केली. येथूनच एक अभिनव पद्धत सुरू झाली. समितीच्या सर्व घरांत नियोजित केलेल्या शिशुगृहांचे संचालकत्व मॉंटेसरी यांच्याकडे देण्यात आले आणि सामान्य बालकांच्या शिक्षणाला नवी दिशा देण्याची संधी त्यांना मिळाली. यानंतर मॉंटेसरी यांनी वैद्यकीय व्यवसायातील प्रतिष्ठा व पैसा यांचा मोह टाळून शैक्षणिक कार्यास स्वतःस वाहून घेतले. मतिमंद मुलांचा मनोविकास होण्यासाठी त्यांच्या ज्ञानेंद्रियांची संवेदनशक्ती व स्नायूंची संचलनशक्ती विकसित करणे आवश्यक आहे, असे डॉ. एडवर्ड सेग्विन या मानसोपचारतज्ज्ञाचे मत आहे. या मताचा मॉंटेसरी यांच्या मनावर प्रभाव पडून त्यांनी मतिमंदांच्या शिक्षणासाठी बालकांना आकर्षून घेणारी, एकाग्रता वाढविणारी आणि त्यांच्या क्षमतेचा विकास घडविणारी अनेक शैक्षणिक साहित्य, खेळणी तयार केली. त्यांतून बालघराचा शास्त्रीय अभ्यासक्रम आणि आखावी कार्यक्रम तयार केला. या साहित्याच्या उपयोगाने मतिमंदांची प्रगती होत असल्याचे दिसून आले. त्यांपैकी काही मुले तर सर्वसामान्य मुलांची बरोबरी करू शकली. या अनपेक्षित यशाने भारावून जाऊन डॉ.मॉंटेसरी यांनी रोम विद्यापीठात तत्त्वज्ञान, मानवशास्त्र व मानसशास्त्र या विषयांचा सात वर्षांचा अभ्यासक्रम पुर्ण केला. या अभ्यासक्रमाचा उपयोग करण्यासाठी त्यांना योग्य संधी लाभली. मनोविकास साधणाऱ्या शिक्षणाची नवीन पद्धती त्यांनी शोधून काढली. ती मॉंटेसरी शिक्षण पद्धती- मॉंटेसरी टिचींग मेथड या नावाने जगभर संबोधली जाते. मॉंटेसरी यांनी बालकांच्या शिकण्याची प्रक्रिया लक्षात घेत लर्निंग बाय कनेक्टिंग हा सिद्धांत मांडला. त्यात त्यांनी शिकण्याच्या तीन पायऱ्या मांडल्या.

बालकांकडून नैसर्गिक रित्या मात्र त्यांच्या सक्रीय सहभागातून दिवसभरातील संपूर्ण घटना आत्मसात केले जाते.

बालकांना नियंत्रित उपक्रम देणे, त्याचे पुन्हा पुन्हा सराव करावे लागते. हेतुपूर्ण सराव आणि आधी इंद्रियांद्वारे आत्मसात केलेल्या माहितीमुळे बालकांना शिकणे दृढ होते. संकल्पना स्पष्ट होण्यासाठी बालकांना उपयुक्त आणि अर्थपूर्ण वाटेल असे काम द्यावे लागते. बालकेही ते अर्थपूर्ण करण्यासाठीचे खेळ अथवा कृती शोधून काढतात.

वरील तीन पायऱ्यांच्या आधारे बालकांच्या सर्व गरजा पुरविणारे आणि विकासाची साधने मॉंटेसरी यांना आपल्या शिक्षण पद्धतीत निर्माण केल्या. मॉंटेसरी यांनी आपल्या दि ब्सॉर्बन्ट माइंड या आपल्या ग्रंथात बालकांच्या विचार प्रक्रियेचा शोध घेतला आहे. त्यात त्यांनी बालकांच्या मनाला ग्रहणशील मन असे संबोधले आहे. प्राथमिक कौशल्ये अतिशय शिस्तबद्धपणे, मानवी मनाकडून कशी आत्मसात केली जातात, याचा सिद्धांत त्यांनी आपल्या ग्रंथातून मांडला आहे. ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांचे मन संवेदनशील असते. त्यांच्या बुद्धीला याच काळात जास्त आकार मिळत असतो. ही बालके अजाणता, उत्स्फूर्तपणे बाहेरील प्रत्येक गोष्ट, घटना आपल्या मनात साठवून ठेवत असतात आणि त्याबाबत विचारपूर्क अर्थ लावत असतात. कळत नकळत जग समजावून घेण्याचा हा कालावधी असतो. त्यामुळे बालकांना कोणतीही कौशल्ये आणि ज्ञान नकळत आत्मसात होईल, अशी व्यवस्था करणे गरजेचे असते. हीच मॉंटेसरी शिक्षण पद्धतीमागील मुख्य भूमिका आहे. मॉंटेसरी यांनी सन १९०९मध्ये मॉंटेसरी शिक्षण पद्धतीच्या शिक्षक-प्रशिक्षणाचा पहिला वर्ग उघडला. मॉंटेसरी यांची शिक्षणविषयक कल्पना वस्तूनिष्ठतेवर उभारलेली होती. तीमध्ये जीवनशक्तीचा आविष्कार हे प्रमुख तत्त्व होते. १९१६ मध्ये त्यांनी ६ ते १२ वर्षे वयोगटातील बालकांना उपयुक्त ठरेल अशी गणित, व्याकरण, भूमिती शिकविण्याची सोपी पद्धत तयार करून त्यावर आधारित सेल्फ एज्युकेशन इन एलीमेंटरी स्कूल हा ग्रंथ लिहिला. पहिल्या जागतिक महायुद्धानंतर त्यांनी स्थापन केलेली इटलीतील संस्था बंद पडली. नंतर त्या अमेरिकेत गेल्या. न्यूयॉर्क येथे त्यांनी मॉंटेसरी शिक्षक-प्रशिक्षण महाविद्यालय स्थापन केले व ते एलिनार पार्कहर्स्ट यांच्याकडे सोपविले. दुसऱ्या महायुद्धापासून त्यांच्या प्रवासास सुरुवात झाली. या प्रवासात त्यांनी शिशुशिक्षणपद्धतीचे बीजारोपण केले. स्पेनला जाऊन त्यांनी प्रयोगशाळा व विद्यालय स्थापन केले. नव्या पद्धतीच्या प्रसारासाठी त्यांनी इंग्लंड, इटली, स्पेन इत्यादी ठिकाणी प्रवास केला. आज जगातील १०१ देशांत सुमारे २२,००० मॉंटेसरीच्या शाळा आहेत. डॉ.मॉंटेसरी या शिशुशिक्षणाच्या पुरस्कर्त्या होत्या. त्यासाठी त्यांनी नवीन तंत्र व उद्योग शोधून काढले. मुलांचे खेळ व छंद यांवर त्यांचे मानसशास्त्र अवलंबून होते. अभ्यासाने मुलांना शीण न येता त्यांचा मानसिक विकास साधला जातो, असे त्यांचे म्हणणे होते.

मॉंटेसरी यांना भारतातील शांततेसाठीचे शिक्षण या शैक्षणिक कार्यासाठी दोन वेळा नोबेल शांती पुरस्काराचे नामांकन मिळाले आहेत. मॉंटेसरी यांनी अनेक पुस्तके लिहिली असून त्यांची काही उल्लेखनीय पुस्तके पुढीलप्रमाणे- दि डिस्कव्हरी ऑफ दि चाइल्ड-१९१२, मॉंटेसरी मेथड-१९१२, डॉ.मॉंटेसरीज ओन हॅंडबुक-१९१४, दि सिस्टिम ऑफ एज्युकेशन-१९१५, दि मदर ण्ड दि चाईल्ड-१९१५, दि अॅडव्हान्स्ड मॉंटेसरी मेथड-१९१६, पीस ण्ड एज्युकेशन-१९३६, एज्युकेशन पॉर ए न्यू वर्ल्ड-१९४६, दि सिक्रेट ऑफ चाइल्डहूड-१९४८, दि ब्सॉर्बन्ट माइंड-१९४९ अशी आहेत..मॉंटेसरी यांचे नोर्टवाइक, हॉलंड येथे दि.६ मे १९५२ रोजी दुःखद निधन झाले. पावन जयंती पर्वावर डॉ.मारिया मॉंटेसरी यांना अनंत कोटी विनम्र अभिवादन !!

**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे,**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली,**
**फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.**

## पान १ वरुन

### तर संबंधीत ...

व्यवस्थापनाने महिला मतदनीसाची प्राधान्याने नियुक्ती करावी. तसेच विद्यार्थी सुरक्षा समित्याचा आढावा गटविकास अधिकाऱ्यांनी नियमितपणे घ्यावा. शाळेच्या परिसरात दर्शनीय भागावर चाईल्ड हेल्पलाईन क्रमांक ११२ नमुद करावा. शाळेतील मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप आणि समतामुलक वातावरण निर्मितीसाठी विविध स्तरावर सखी सावित्री समिती तसेच विद्यार्थी सुरक्षा समितीने नेमून दिलेली कार्ये विहीत कालावधीत पार पाडणे आवश्यक असल्याच्या सुचनाही यावेळी दिल्या. तसेच शाळेत अनुचित घटना घडल्यास तात्काळ गुन्हा नोंद केल्यास सर्व गोष्टींना सामोरे जावे लागेल याची मनात भिती बाळगू नका, या सर्व प्रकरणात जिल्हा प्रशासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या कार्यशाळेस जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, प्रशालेचे मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख, साधन व्यक्ती यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

### येलो अलर्ट ...

रहावे. मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणा-या / लोंबणाऱ्या तारांपासून दूर रहावे. वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा. अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधावा. असे निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### महोत्सवास मोठ्या ...

शाखा पंकज जाधव यांची उपस्थिती राहणार आहे.

हा कार्यक्रम हा दिनांक ०१-०९-२०२४ रोजी असणार असून, कार्यक्रमाची रूपरेषा दुपारी १२.०० ते ५.०० वाजेपर्यंत ढोल पथक स्पर्धा तसेच सायं ५.०० ते १०.०० वाजेपर्यंत दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे, या दहीहंडी महोत्सवात भाग घेण्यासाठी मुंबई, ठाणे येथून दहा गोविंदा पथकाने भाग घेतला असून हे सर्व गोविंदा पथक उद्या जालना शहरात दाखल होणार आहेत. हा कार्यक्रम जालना शहरातील चंद्रशेखर आझाद मैदान येथे होणार आहे. या दहीहंडी उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे मराठवाड्यातील सर्वात मोठी दहीहंडी म्हणून या दहीहंडीचा नावलौकिक आहे.

दहीहंडी स्पर्धेत विजेत्या गोविंदा संघांना प्रथम बक्षीस १,५१,०००/-, द्वितीय बक्षीस ५१,००० /-, तृतीय बक्षीस ३१,०००/- तसेच ढोल पथक स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस ५१,०००/-, द्वितीय बक्षीस ३१,००० /- जिंकण्याची संधी मिळणार आहे.

या दहीहंडी महोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवचैतन्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजक प्रतिक दानवे यांनी केले आहे.

### मोदींचा माफीनामा...

मागणी करत आहेत. दरम्यान, कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी काही वेळापूर्वी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना माफी मागण्याची गरज का पडली? कारण त्यांनी चूक केली आहे आणि मोदींनी त्यांची चूक आता मान्य केली आहे. मोदींसह सत्ताधाऱ्यांनी चूक मान्य केली असेल तर त्यांनी काही गोष्टी तपासून बघायला पाहिजे होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला, त्या स्मारकाचा पाया व्यवस्थित होता का? चबुतरा व्यवस्थित होता का? मूर्ती मजबूत होती की नाही? या पुतळ्याला राज्याच्या सांस्कृतिक संचालनालयाने प्रमाणपत्र दिलं होतं का? पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी या गोष्टी तपासायला पाहिजे होत्या. त्यांच्या विभागाने देखील या गोष्टींची तपासणी करायला पाहिजे होती.

कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले, पेशव्यांच्या काळातही छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला जात होता आणि आता शिवाजी महाराजांच्या नावाने राजकारण करणाऱ्या पेशव्यांनी सुद्धा पुन्हा एकदा महाराजांचा अपमान केला आहे. त्यामुळे माफीने हा प्रश्न सुटणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार या लोकांनी महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला ठेस पोहोचवली आहेत. त्यामुळे या लोकांनी सत्तेतून बाहेर व्हावं, नाहीतर राज्यातील जनता त्यांना सत्तेतून बाहेर खेचल्याशिवाय शांत बसणार नाही.

### ए.जे. बोराडे ...

येथील सरपंच आप्पासाहेब खंदारे, प्रमोद खंदारे, विलास खंदारे, काका खंदारे, दत्तराव खंदारे, मधुकर खंदारे, बिडवे सातोना येथे माऊली बिडवे, विलास बिडवे, शंकर बिडवे, दिगंबर बिडवे, बाबाराव तायडे, उद्धवराव खेंबड, बिडवे जगन्नाथ बिडवे, सचिन बिडवे, बळीराम बिडवे, रवी बिडवे, अनंता बिडवे, अर्जुन बिडवे, विकास बिडवे यांची उपस्थिती होती.

# चैतन्य टेक्नो स्कूलवर शिक्षण विभागाची पुन्हा कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील संभाजीगर भागात असलेल्या चैतन्य टेक्नो स्कूलला शिक्षण विभागाकडून अनधिकृत शाळा म्हणून घोषित करीत यापुर्वी दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. परंतु, तरीही व्यवस्थापनाने शाळा सुरू ठेवली होती. त्यामुळे गुरूवारी पुन्हा शिक्षण विभागाने शाळा प्रशासनास नोटिस बजावली असून, तात्काळ शाळा बंद न केल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही नोटिसीद्वारे देण्यात आला आहे. जालना शहरातील संभाजीनगर येथील चैतन्य टेक्नो स्कूलबाबत प्राप्त तक्रारीनुसार शिक्षण विभागाकडून चौकशी करण्यात आली होती. चौकशीदरम्यान संबंधित शाळेला शासन मान्यता नसणे, युडायस क्रमांक नसणे आदी बाबी समोर आल्या होत्या. त्यामुळे अनधिकृत शाळा सुरू ठेवू नये, अशा सूचना शिक्षण विभागाने दिल्या होत्या. परंतु, नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होताच शाळा व्यवस्थापनाने मुलांचे प्रवेश करून घेतले. त्यानंतर शिक्षण विभागाकडून पुन्हा शाळेची चौकशी करून नोटिस दिली होती. शिवाय शिक्षणाधिकाऱ्यांनी २३ जुलै रोजी सुनावणी घेत शाळा अनधिकृत घोषित करून एक लाख रूपयांचा दंड ठोठावला होता. तसेच शाळा सुरू असल्यापासून प्रतीदिन दहा हजारांचा दंड ठोठावला होता. शिक्षण विभागाने कारवाई करूनही ही शाळा सुरू असल्याचे समजल्यानंतर पुन्हा शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी २९ ऑगस्ट रोजी सकाळीच शाळा प्रशासनाला नोटिस दिली आहे. अनधिकृत शाळा तात्काळ बंद करा अन्यथा कायदेशीर कारवाई करू, असा इशाराही देण्यात आला आहे.

## पान १ वरुन

### आगामी निवडणुकांसाठी ...

निवडणुकीत ज्या पद्धतीने पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले तसेच परिश्रम विधानसभा निवडणुकीत घेण्यासाठी आतापासूनच सज्ज व्हावे. मतदार हा महाविकास आघाडीच्या पाठीशी असल्याने विधानसभा निवडणुकीत देखील विजय आपलाच होईल असा विश्वास खा.डॉ. कल्याण काळे यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी बोलतांना आ.कैलास गोरंटयाल म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत किल्ला लढवला. कार्यकर्त्यांच्या बळावर आणि जनतेची भक्कम साथ यामुळे लोकसभा निवडणुकीत खासदार काळे यांनी मोठया मताधिक्याने विजय मिळवला. विधानसभा निवडणुकीत देखील विजयाची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी सज्ज व्हावे असे आवाहन आ.कैलास गोरंटयाल यांनी केले.प्रशिक्षण देण्यासाठी उपस्थीत असलेले नीरज जैन व इतर मान्यवरांनी उपस्थीत कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जा दिली.यावेळी अण्णासाहेब खंदारे, शेख इब्राहिम, राम कुऱ्हाडे,अब्दुल रफीक, योगेश पाटील, शिवप्रकाश चितळकर, शेख शमशोद्दीन, शेख अझहर, नारायण वाढेकर, जावेद अली, बाबासाहेब सोनवणे, गणेश वाघमारे, कलीम खान, बासेद कुरेशी, जावेद बेग यांच्यासह कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महिलांच्या सुरक्षेसह ...

सभागृह (किंमत १० लक्ष रुपये) भूमिपूजन, मराठवाडा वॉटर ग्रीड योजने अंतर्गत ६७ हजार लिटर पाणीसाठा क्षमतेच्या जलकुंभाचे भूमिपूजन कार्यक्रम, पाष्टा येथे दलीत वस्ती अंतर्गत सामाजिक सभागृह (किंमत १० लक्ष रुपये) भूमिपूजन, संत भगवान बाबा मंदिरासमोरील सभामंडप (किंमत १० लक्ष) रेणुका माता मंदिरासमोरील सभा मंडप (किंमत १० लक्ष रुपये) सिमेंट रस्ता (किंमत १० लक्ष रुपये) लोकार्पण आणी मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेअंतर्गत जळकुंभाद्वारे पाणी सोडणे कामाचे लोकार्पण व भूमिपूजन सोहळा. बोरगाव मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेअंतर्गत ७७ हजार लिटर पाणी साठा क्षमतेच्या नवीन जल कुंभाचे लोकार्पण, दलित वस्ती अंतर्गत सामाजिक सभागृहाचे भूमिपूजन सोहळा आणी संत भगवान बाबा महाराजांच्या महाआरती या कामांचा समावेश आहे.

पुढे बोलतांना आमदार लोणीकर म्हणाले की राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जन-कल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना राबवली जाणार आहे. या उपक्रमांर्तगत तयार केलेल्या संकेतस्थळाच्या माध्यमातून रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योजक जोडले जातील. रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणातून मिळून त्यांची क्षमतावाढ होईल तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण योजनेद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे या योजनेचा परतूर विधानसभा मतदार संघातील तरुणांनी लाभ घेण्याचे आवाहन देखील या वेळी आमदार लोणीकर यांनी केल मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने बाबत पुढे बोलतांना आमदार लोणीकर म्हणाले की मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि क्रांतिकारी योजना आहे. ही योजना लाडक्या बहिणींसाठी कायमस्वरुपी सुरु राहणार आहे. या आर्थिक वर्षात योजनेसाठी ३५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्याची आर्थिक स्थिती जसजशी मजबूत होत जाईल तसे सद्यस्थितीत असणारी दरमहा दीड हजार रुपयांची रक्कम वाढवत जावून टप्या-टप्याने ही रक्कम तीन हजार रुपयांपर्यंत करण्यात येणार असून ही योजना काहीही झाल तरी बंद पडणार नाही. त्या करीता राज्यात पुन्हा महायुती च सरकार सत्तेत असणं गरजेच आहे.

भगवान महावीर स्वामी निर्वाण कल्याणक जिल्हास्तरीय महोत्सव समिती

## सुदेश सकलेचा, विरेंद्र रुणवाल, प्रमोद देसरडा, संजय लव्हाडे, ॲड. अनिल संचेती, अशोक संचेती यांचा समावेश

**जालना । प्रतिनिधी -** श्री भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण वर्षानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासनाच्यावतीने भगवान महावीर स्वामी निर्वाण कल्याणक जालना जिल्हास्तरीय समितीचे गठन करण्यात आले असून, या समितीवर सुदेश सकलेचा, विरेंद्र रुणवाल, प्रमोद देसरडा, संजय लव्हाडे, ड. अनिल संचेती, अशोक संचेती (बदनापुर ) यांचा समावेश करण्यात आला आहे.

भगवान महावीर स्वामी निर्वाण कल्याणक समितीचे अध्यक्ष तथा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी या समितीवर उपरोक्त मान्यवरांची नियुक्ती ललित गांधी, संदीप भंडारी यांच्या शिफारशीनुसार केली आहे.

२४ वे जैन तीर्थंकर भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक महोत्सवानिमित्त महाराष्ट्र शासनाने मंगल प्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केलेली आहे. या समितीची बैठक दि. ७ ऑगस्ट रोजी मंत्रालयात संपन्न झाली. या बैठकीत ठरलेल्या निर्णयाप्रमाणे आयोजित करावयाचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला, शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजनासाठी तसेच कार्यक्रमांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्याचा निर्णय सदर बैठकीत घेण्यात आला होता. त्याअनुषंगाने राज्यस्तरीय समितीच्या दिशानिर्देशानुसार जालना' जिल्ह्यात उपरोक्त कार्यक्रमांचे आयोजन व त्या संबंधीत विविध शासकीय विभाग, निमशासकीय विभाग, शैक्षणिक संस्था, शाळा व्यवस्थापन, जैन संघ यांच्याशी समन्वय करून कार्यक्रम पार पाडण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली असून, या समितीवर सुदेश सकलेचा, विरेंद्र रुणवाल, प्रमोद देसरडा, संजय लव्हाडे, ड. अनिल संचेती, अशोक संचेती यांचा समावेश करण्यात आला आहे.



सुदेश सकलेचा | प्रमोद देसरडा | अशोक संचेती | संजय लव्हाडे | वीरेंद्र रुणवाल | अनिल संचेती

भगवान महावीर स्वामी यांच्या २५५० व्या निर्वाण कल्याणक महोत्सवानिमित्त आयोजित करावयाचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला, शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा जिल्हास्तरावर आयोजनासाठी राज्यस्तरीय समितीच्या दिशानिर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करणे, त्यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महानगरपालिकेचे आयुक्त, मुख्याधिकारी, शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, शाळा व्यवस्थापन, जैन संघ यांच्याशी समन्वय करून कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे, ही जबाबदारी जिल्हास्तरीय समितीला पार पाडावी लागणार आहे. तसेच तालुका, जिल्हास्तरावर निबंध स्पर्धाचे पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यास आवश्यक तो समन्वय करून अंमलबजावणी करावी लागणार आहे.

## जालनेकरांसाठी दर्जेदार कार्यक्रमाची मेजवाणी देणार - राजेंद्र गोरे

### गणेश फेस्टीव्हल : मान्यवरांच्या उपस्थितीत सभा मंडपाचे पूजन

**जालना । प्रतिनिधी -** वर्षभरानंतर जालना गणेश फेस्टीव्हल होत आहे. त्यामुळे सर्वांमध्येच उत्स्फूर्तपणा दिसून येत आहे. हा फेस्टीव्हल उत्स्फुर्तच व्हावा, असेच प्रयत्न सुरु असून यंदाही जालनेकरांसाठी दर्जेदार कार्यक्रम घेण्याचा मनोदय फेस्टीव्हलचे अध्यक्ष राजेंद्र गोरे यांनी बोलून दाखवला. जालना गणेश फेस्टीव्हलच्या सभा मंडपाचे पूजन आज शुक्रवारी विनायक महाराज फुलंब्रीकर यांच्या मंत्रोच्चारात करण्यात आले. हा फेस्टीव्हल अत्यंत बहारदारपणे साजरा व्हावा, तो जनतेच्या लक्षात राहावा, असाच प्रयत्न करण्यात येत असून यासाठी प्रत्येकाच्या सूचनांचा आदर करण्यात येत आहे. हा फेस्टीव्हल अत्यंत चांगल्या प्रकारे साजरा व्हावा यासाठी यासाठी समितीचे प्रयत्न होत असल्याचे दिसून येत आहे.

जालना गणेश फेस्टिवलच्या सभा मंडपाचे पूजन उद्योजक घनशाम गोयल यांच्या हस्ते आज शुक्रवारी करण्यात आले. यावेळी जालना गणेश फेस्टीवलचे अध्यक्ष राजेंद्र गोरे, महानगर पालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, जालन्याचे डीवायएसपी श्री. अनंत कुलकर्णी, जालना गणेश फेस्टिवलची संस्थापक अध्यक्ष संजय लाखे पाटील, भास्करराव दानवे, राजेश राऊत, किरण गरड, सुरेश मुळे, प्रा.राजेंद्र भोसले, अशोक उबाळे, शरद देशमुख, साईनाथ पवार, गणेश महासंघाचे अध्यक्ष अशोकराव पांगारकर, चमनचा राजा गणेश मंडळाचे अशोक पडुळ, ज्ञानेश्वर डुकरे, बबनराव गाडेकर, मंगेश चव्हाण, प्रशांत गाढे, रामा खांडे तसेच गणेश सुपारकर, राम सतकर, शंकर लुंगे, अजिंक्य घोगरे, प्रशांत वाढेकर, अशोकराव आगलावे, चंद्रशेखर वाळिंबे, जगन्नाथ काकडे, अवनिश गरड, प्रतिक दानवे, सचिन चौधरी, यांच्यासह कार्यक्रमास परिसरातील गणेश भक्तांची भोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संजय देठे यांनी तर शेवटी उपस्थितांचे आभार सुभाष कोळकर यांनी मानले.



## आगामी निवडणुकांसाठी सज्ज राहावे - खा. डॉ. कल्याण काळे

### बूथ कमिटी, बीएलए प्रशिक्षण शिबिर उत्साहात



**जालना । प्रतिनिधी -** आगामी विधानसभा निवडणुकीसाठी कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पूर्ण ताकतीने सामोरे जात महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी असे आवाहन खा. डॉ.कल्याण काळे यांनी आज येथे बोलतांना केले.

आगामी काळात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जालना जिल्हा व शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या वतीने जालना शहरातील गुरू गणेश भवनमध्ये आज शुक्रवारी बूथ कमिट्या आणि बीएलए साठी आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण शिबीराचे उद्घाटन खा. डॉ. कल्याण काळे आणि आ. कैलास गोरंटयाल यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना डॉ.काळे बोलत होते. यावेळी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस तर्फे प्रशिक्षण देण्यासाठी नीरज जैन, विशाल, जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, माजी आमदार सुरेशकुमार जेथलीया, शहर जिल्हाध्यक्ष शेख महेमुद, राजेंद्र राख, राम सावंत,विजय चौधरी,दिनकर घेवंदे, नंदाताई पवार, प्रभाकर पवार आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना डॉ.कल्याण काळे म्हणाले की, लोकसभा

पान २ वर

## पाण्यासाठी एमआयएमचे भोकरदनमध्ये उपोषण

### लेखी आश्वासनानंतर उपोषण सोडले; एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख माजेद यांची मध्यस्थी

**भोकरदन । प्रतिनिधी -** भोकरदन शहरातील पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत जात आहे, याचा महिलांना व सुजाण नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे, यासंदर्भात एम आयएम पक्षाच्यावतीने वारंवार पाठपुरावा करण्यात येत होता. मात्र, कुंभकर्णा झोपेत असलेल्या प्रशासनाला जाग येत नव्हती. या प्रशासनाला जाग आणण्यासाठी गेल्या दोन दिवसांपासून एमआयएमचे पदाधिकारी हे उपोषणास बसले होते. शुक्रवार (दि ३०) रोजी पक्षाचे जिल्हाध्यक्ष शेख माजेद यांनी माजी खा. इम्तियाज जलील यांच्याशी फोन चर्चा केली. त्यानंतर भोकरदन मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन समस्यांचे निराकारण करण्याबाबत लवकरात लवकर उपाययोजना कराव्यात व जनतेचे प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यासंदर्भाने चर्चा केली. मुख्याधिकारी संतोष वाघमारे यांनी एमआयएमच्या मागण्यांवर तात्काळ उपाययोजना करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर उपोषणस्थळी उपोषणकर्त्यांना लेखील आश्वासन देत उपोषण सोडविले.

दरम्यान माजी खा. इम्तियाज जलील यांनी भोकरदनचे मुख्याधिकारी संतोष वाघमारे यांच्याशी दुरध्वनीवरून संपर्क साधत या प्रकरणी लक्ष घालून तोडगा काढावा, पाण्यासाठी व भोकरदन शहरातील नागरिकांसाठी जी मदत लागल्यास मंत्रालयीन पातळीवर पाठपुरावा करण्याचे आश्वासन यावेळी माजी खा. जलील यांनी दिले.

दिवसांनी तर कधी महिनाभराने पाणीपुरवठा होत असून यावर कायमस्वरूपी तोडगा एमआयएमच्यातवीने शेख जावेद, सिराज पठान, नुज़ेर शाह, रिज़वान बेग, शेख



भोकरदनमध्ये कायम स्वरूपी पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. पंधरा काढण्यात यावा. खडकपूर्णा प्रकल्पातून पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी फारुख, शेख फरदिन, सय्यद समीर आदींच्यावतीने करण्यात आली होती.

शंभु सावरगाव, ढगी, पिंपळवाडी, एरंड वडगाव, सावरगाव भागडे, पाष्टा, बोरगाव येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन

## महिलांच्या सुरक्षेसह आर्थिक सक्षमीकरणासाठी सरकार प्रयत्नशील - आ. बबनराव लोणीकर

**मंठा । प्रतिनिधी -** भारताची वाटचाल विकसित देशाकडे सुरू असून २०४७ पर्यंत आपल्याला हे लक्ष्य गाठावयाचे आहे. हे लक्ष्य साधताना देशातील प्रत्येक महिलेच्या सुरक्षिततेसोबतच आर्थिक सक्षमीकरणासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. महिलांच्या सर्वांगीण प्रगतीमुळे आपण विकसित भारताचे ध्येय नक्कीच गाठू, स्वयंसहायता गटाला आर्थिक ताकद देतानाच गरीबांसाठी घरकूल बांधण्याच्या कामाला गती देण्यात आली आहे. आतापर्यंत महाराष्ट्र राज्यात चार कोटी घरकूल वाटप करण्यात आली असून परतूर विधानसभा मतदार संघात अठरा हजार घरकुल बांधकामास मंजुरी देण्यात आली आहे. आगामी काळात महाराष्ट्र राज्यात ३ कोटी घरे बांधण्यात येतील. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतूर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.

सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेबाबत पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की बालसंगोपन योजनेचा मुख्य उद्देश महाराष्ट्र राज्यातील अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या ० ते १८ वयोगटातील मुलं मुलींना संस्थेत दाखल करण्याऐवजी पर्यायी कुटूंब उपलब्ध करुन देणे व संस्थेतील वातावरणाऐवजी कौटुंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास घडवून आणणे हा आहे.

सदर योजना ही संस्थाबाहय योजना असून या योजनेअंतर्गत ० ते १८ वयोगटातील मुलामुलींना थेट संगोपनाकरिता महाराष्ट्र राज्य सरकार प्रती माह प्रती लाभार्थी दोन हजार दोनशे रुपये यवढे अर्थसहाय्य देते. अनाथ, निराधार, निराश्रित, बेघर, दुर्धर आजारी पालकांची मुले, कैद्यांची मुले या योजनेचा लाभ घेतात. प्रत्यक्ष जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी अथवा स्वयंसेवी संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते हे गृहचौकशी करुन संबंधित बाल कल्याण समितीस अहवाल सादर करतात. त्या अहवालाच्या आधारे बाल कल्याण समितीकडून दाखल आदेश घेवून लाभार्थ्यांस जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे मार्फत बालसंगोपन या योजनेचा लाभ देण्यात येतो. शासन निर्णयान्वये बालसंगोपन योजनेचे नाव बदलून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना असे करण्यात आले आहे. या योजने चा लाभ परतूर विधानसभा मतदारसंघातील मंठा परतूर जालना तालुक्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने लवकरच अनाथ बालक पालक मेळाव्याचे आयोजन आपण करत आहोत. या मेळाव्याला यशस्वी करण्यासाठी परतूर विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी पदाधिकाऱ्यांनी नेत्यांनी विशेष प्रयत्न करावेत असे आवाहन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले.



शुक्रवारी (दि ३०) रोजी शंभु सावरगाव तालुका जिल्हा जालना येथे मराठवाडा वॉटर ग्रीड योजने अंतर्गत पन्नास हजार लिटर क्षमता असलेल्या जलकुंभाचे भूमीपूजन कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.

या वेळी व्यासपिठावर ज्ञानेश्वर माऊली शेजुळ विकास पालवे जिजाबाई जाधव विक्रम उफाड गजानन उफाड डॉक्टर पालवे डॉक्टर शरद पालवे प्रभाकर पालवे गणेश खैरे प्रकाश इलग दिलीप जोशी दिलीप पवार अशोक डोके गणेश मोरे नंदू घोडे सौरभ माहुरकर गजानन राठोड आसाराम खरात विजय घाडगे रामेश्वर काकडे सुग्रीव चवरे विष्णुपंत शहाणे गजानन राठोड प्रमोद भालेकर जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप पवार सरपंच शोभाबाई सदावर्ते उपसरपंच कृष्णा केंद्रे अंतिकाबाई सदावर्ते सायली सांगळे धोंडाबाई घुले दुर्गाबाई चव्हाण विकास तुरेराव भगवान केंद्रे मारोती केंद्रे राहुल सदावर्ते संजय जगताप नरेश सांगळे विठ्ठल पवार लक्ष्मन सानप रमेश चाटे जनार्धन जगताप दिनकर चव्हाण तानाजी केंद्रे संजय सांगळे राजू घुले अशोक सदावर्ते सरपंच भीमराव खाडे उपसरपंच दत्ता नरवडे उद्धव तळेकर प्रभाकर तळेकर जनार्धन नरवडे सुभाष नरवडे दत्ता नरवडे पंढरीनाथ नरवडे राजू सिल्लोड भगवान नरवडे कैलाश सिल्लोडे खंडू नरवडे संतोष तळेकर सुभाषराव तळेकर राजू नरवडे पुंडलिक पालवे जयाजी गायकवाड शिवाजी पालवे भगवान पालवे गजानन पालवे सुधाकर कऱ्हाळे रणजित कऱ्हाळे रामप्रसाद कऱ्हाळे सुरेश पालवे गजानन पालवे धोंडिबा पालवे नागोराव पालवे प्रभाकर पालवे वसंत पालवे कल्याण डोके रमेश खाडे आलम खाडे भगवान खाडे निवृती खाडे शिवानंद पालवे संदीप ढाकणे सोनू सानप गणेश पालवे रमेश गिते भगवान गिते यांची उपस्थिती होती.

परतुर-मंठा विधानसभा मतदार संघातील विविध गावांत आ. लोणीकर यांच्या उपस्थितीत विविध विकास कामांचे उदघाटन व भूमि पुजन करण्यात आले. यात. ढगी येथे दलीत वस्ती अंतर्गत सामाजिक सभागृह (किंमत १०लक्ष रु) भूमिपूजन, मराठवाडा वॉटर ग्रीड योजने अंतर्गत ७६ हजार लिटर क्षमतेच्या जलकुंभाचे लोकार्पण आणी दोन अंगणवाडी खोली (किंमत २२ लक्ष ५० हजार) इमारती चे भूमिपूजन, पिंपळवाडी येथे अटल वन योजनेअंतर्गत घनदाट वृक्ष लागवड आणी बांधकाम कामगारांना साहित्य वाटप कार्यक्रम, एरंड वडगाव मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेअंतर्गत ५९ हजार लिटर पाणीसाठा क्षमतेच्या जलकुंभाचे भूमिपूजन समारंभ सोहळा, सावरगाव भागडे येथे दलीत वस्ती अंतर्गत सामाजिक

पान २ वर

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.